
ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



# दशवार्षिक विकास आराखडा

(भाग-१)

पथदर्शक आराखडा

२०२५-२०३५

# विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल ती परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

– कुसुमाग्रज



ज्ञानगंगा घरोघरी


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


# दशवार्षिक विकास आराखडा

(भाग-१)

## पथदर्शक आराखडा

---

नियोजन व संयोजन कक्ष

---


ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

## विद्यापीठ दृष्टिक्षेप

### शैक्षणिक वर्ष २०२४–२५

| | | |
|---|---|---|
| विद्याशाखा | : | १३ |
| शिक्षणक्रम | : | १२१ |
| विभाग | : | ०४ |
| विभागीय केंद्रे | : | ८ (प्रस्तावित ७) |
| अभ्यासकेंद्रे | : | १,७६८ |
| विद्यार्थी संख्या | : | ४,८७,४७६ |

## संयोजन : विद्यार्थी सेवा विभाग

### सहभाग व सहकार्य

प्रा. डॉ. राम ठाकर
श्री. सोमनाथ जाधव
श्री. योगेश जाधव
श्री. माणिक गांगोडे
डॉ. माधुरी खर्जुल
श्री. सचिन सूर्यवंशी
श्री. आनंद बर्वे
श्री. राहुल वाघदरे
श्रीमती ज्योती पाटील
श्री. विजय शार्दुल
श्री. विजय भंडारे


## निर्मिती

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२



© २०२५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : एप्रिल २०२५
- **मुखपृष्ठ** : श्री. कांचन शिंदे
- **अक्षरजुळणी** : श्री. विजय शार्दुल
- **प्रकाशक** : श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

***X25-101 / Shardul***

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## दशवार्षिक विकास आराखडा समिती
## (२०२५ ते २०३५)

### समिती सदस्य

**प्रा. राजन वेळूकर, अध्यक्ष**

**श्री. महेश झगडे, सदस्य**

**श्री. हनुमंतराव गायकवाड, सदस्य**

**प्रा. मंजुलिका श्रीवास्तव, सदस्य**

**श्री. पोपटराव पवार, सदस्य**

**प्रा. रमेश वरखेडे, सदस्य**

**प्रा. संजय चाकणे, सदस्य**

**प्रा. विश्वास गायकवाड, सदस्य**

**डॉ. मधुकर शेवाळे, सदस्य**

**प्रा. प्रकाश देशमुख, सदस्य सचिव**

या समितीने वेळोवेळी बैठका घेऊन विद्यापीठाच्या दशवार्षिक विकास आराखड्याचे संकल्पनात्मक प्रारूप तयार केले. हे प्रारूप तयार करताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी केलेल्या पायाभूत सूचना आणि दिशादिग्दर्शनाचा लाभ झाला. तसेच विविध विद्याशाखेच्या संचालकांनी आपल्या विद्याशाखांच्या भविष्यकालीन वाटचालीसंबंधी मांडलेल्या व अपेक्षा यांचाही यथायोग्य समावेश प्रस्तुत आराखड्यात करण्यात आला आहे. प्रस्तुत विकास आराखड्याचा पूर्वार्ध 'पथदर्शक आराखडा' या स्वरूपात सादर करण्यात येत आहे. उत्तरार्धातील 'कृती आराखडा' स्वतंत्रपणे तयार करण्याचे प्रस्तावित आहे. दरम्यान 'पथदर्शक आराखडा' अंतिम स्वरूपात **दिनांक १८ एप्रिल २०२५** रोजी सादर करण्यात येत आहे.

स्थळ : नाशिक

दिनांक : १८ एप्रिल २०२५

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१. | प्रास्ताविक/भूमिका कथन | ०१ |
| ०२. | ‘मुक्त शिक्षणा’पलीकडे (Moving Beyond Open) | ०२ |
| ०३. | सीमोल्लंघन (Moving Beyond Place) | ०४ |
| ०४. | प्रस्थापिततेपलीकडे मार्गक्रमणा (Moving Beyond the Normal) | ०७ |
| ०५. | भविष्योन्मुख होणे (Moving Beyond the Now) | ०९ |
| ०६. | उपसंहार | १३ |

# १. प्रास्ताविक/भूमिका कथन

१. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होत आहे. या पार्श्वभूमीवर 'मुक्त शिक्षणा'ची संकल्पना केवळ प्रवेशापुरती मर्यादित न ठेवता अधिक सर्वसमावेशक व शैक्षणिक सक्षमीकरणाच्या भूमिकेतून विस्तारित करण्याची गरज निर्माण झाली आहे. मुक्त शिक्षणप्रणालीचा गुणात्मक विकास आणि क्षेत्र व्याप्तीचा विस्तार करण्यासाठी वर्तमान चौकटीतून बाहेर पडावे लागेल. दूरस्थ शिक्षण, आभासी शिक्षण आणि सहयोगी शिक्षण या विविध प्रणालींचा संश्लेष साधणारी मुक्त शिक्षणाची अधिक खुली व व्यापक पुनर्घटना करण्याच्या भूमिकेतून नव्या विकासनीतीचा संकल्पनात्मक आराखडा तयार करण्यात आला आहे.

२. ह्या आराखड्याचे तात्त्विक अधिष्ठान पुढील चतुःसूत्रीवर अधिष्ठित आहे.

(१) 'मुक्त शिक्षण' संकल्पनेचा पैस विस्तारणे. (Moving Beyond Open)
मुक्त व पारंपरिक शिक्षणप्रणालीतील सहयोगाचा साकव निर्माण करणे. (Bridging Open and Inclusion)

(२) स्थळकेंद्रीय चौकटींचे सीमोल्लंघन (Moving Beyond Places)
(Transforming Communities Through Belonging and Relationship)
परस्परांची सामिलकी आणि बांधिलकी या सूत्रांतून सामाजिक पुनर्घटना साधणारी समुदायकेंद्रित शिक्षणप्रणाली विकसित करणे.

(३) प्रस्थापित रचनाबंधापलीकडचा शिक्षणविचार. (Moving Beyond the Normal)
प्रसंगी जोखीम पत्करून स्पर्धात्मकतेत अग्रभागी राहण्याची विकासनीती स्वीकारणे.
(Adopting Innovative Ideas, Taking Calculated Risk)

(४) वर्तमान चौकटीतून बाहेर पडणे. (Moving Beyond the Now) बदलत्या काळाशी जुळवून घेत शिक्षणप्रक्रियेत लवचीकता आणि स्वीकृतीशीलता आणून पायाभूत बदल घडवून आणणे. (Supporting Transformative and Incremental Change Through Agility and Adoptability)

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर माध्यमांतील नवतंत्रज्ञानाचा मुक्त शिक्षणप्रणाली अधिकाधिक लोकसन्मुख करण्यासाठी अभिनव अध्ययन-अध्यापन प्रारुपे विकसित करणे.

मुक्त शिक्षणप्रणालीला सार्वत्रिक स्वीकृतीशीलता प्राप्त होण्यासाठी ही शिक्षणप्रणाली अधिकाधिक कालसुसंगत, गतिमान व चैतन्यदायी कशी करता येईल या दृष्टीने प्रस्तुत विकास आराखड्याची आखणी करण्यात आली आहे.


मुक्त शिक्षणप्रणालीचे हे सीमोल्लंघन यशस्वीरित्या साध्य करण्यासाठी विद्यापीठाला बदलत्या परिवर्तनशील व गतिशीलतेचा युगधर्म लक्षात घेऊन नवी अध्ययन-अध्यापन संसाधने आणि अत्याधुनिक प्रवर्तनपद्धती विकसित करण्याचा कृतिकार्यक्रम हाती घ्यावा लागणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने अग्रक्रमाने पूर्णवेळ/अर्धवेळ/सहयोगी तत्त्वावर प्रगमनशील विचारांचे व्यासंगी व सर्जनशील प्रतिभेचे प्रज्ञावंत यांचा संच उभा करण्याची गरज आहे. या नव्या उमेदीच्या प्रज्ञावंतांच्या सहयोगातून हे ध्येय आपण गाठू शकू याचा विश्वास आहे.

***

'मुक्त शिक्षणा'पलीकडे

# MOVING BEYOND

## OPEN, DISTANCE AND ONLINE EDUCATION



## २. मुक्तशिक्षणापलीकडे : मुक्त व दूरस्थ शिक्षण यांच्यातील दरी भरून काढणे

### २.१ समन्वित शिक्षणासाठी पायाभूत सुविधा उभारणे

- **एकत्रित डिजिटल शिक्षण व्यासपीठ :** मुक्त (Open), दूरस्थ (Distance), ऑनलाईन शिक्षण (OL), अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (LMS) व यशवंत ऑनलाईन ओपन कोर्सेस (YOOC) एकाच ठिकाणी जोडणारे सुसंगत डिजिटल पर्यावरण.
- **सर्व प्रवेशयोग्य सामग्रीची एकत्र नोंदणी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एन.ई.पी.) नुसार बहुभाषिक व बहुज्ञानशाखीय पाठ्यसामग्रीची खुली उपलब्धता.
- **ऑनलाईन व ऑफलाईन सुसंगती :** इंटरनेट नसलेल्या भागांसाठी टीव्ही, रेडिओ, पेनड्राईव्ह अशा माध्यमांचा वापर.

### २.२ तांत्रिक व शैक्षणिक गुणवत्ता सुनिश्चित करणे

- **सर्व स्तरांवर समान गुणवत्ता निकष :** स्वयम् (SWAYAM) स्वयंप्रभा, IGNOU, NPTEL आणि इतर शैक्षणिक मंचांवरील (प्लॅटफॉर्मवरील) अभ्यासक्रमांना एकसंध शैक्षणिक मापदंड लावणे.
- **शैक्षणिक सामग्रीचे मूल्यांकन व सुधारणा :** विद्यार्थी व इतर भागीदारांच्या अभिप्रायांवर व प्रत्याभरणावर आधारित अध्ययन सामग्रीचे अद्ययावतीकरण व परिष्करण करणे.
- **शिक्षकांचे प्रशिक्षण :** विविध अध्यापन तंत्रे, मूल्यांकन कौशल्ये व डिजिटल साधनांचा प्रभावी वापर यावर केंद्रित प्रशिक्षण

### २.३ विद्यार्थी सहभाग वाढविणे

- **अध्ययनशील समाजाची घडण (Learning Communities) :** WhatsApp, Telegram, Discord, YouTube, X Handle यांसारख्या इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांचा (ॲप्सचा) वापर करून अध्ययनशील समाज घडविणे. त्यासाठी बहुमाध्यम संसाधनांच्या देवघेवीतून दृकश्राव्यपट, आंतरक्रियात्मक सादरीकरणे यांची अध्ययनसामग्री पेढी विकसित करणे.
- **मूल्यवर्धित सेवा :** व्यवसाय मार्गदर्शन, मानसिक आरोग्य साहाय्य व ऑनलाईन सल्लागार सेवेचा समावेश.
- **सहअध्ययन प्रणाली (Peer-to-Peer Learning) :** विद्यार्थ्यांमधील सहअध्ययन, प्रकल्प-आधारित शिक्षण व प्रत्याभरण (फीडबॅक) प्रणालीचा विकास.

## २.४ अभ्यासक्रमात सुसंगती आणि लवचीकता आणणे

- **श्रेयांकांतरण (क्रेडिट ट्रान्सफर) व शैक्षणिक पेढी (अकॅडमिक बँक) प्रणाली :** विद्यार्थ्यांना विविध मुक्त व दूरस्थ शिक्षण संस्थांमधून अध्ययन करताना श्रेयांक मिळण्याची मुभा.
- **मोबाईल–अनुकूल अभ्यासक्रम :** स्मार्टफोनवर सहज चालणारे, किमान विदा (डेटा) असणारे अध्ययन पाठ.
- **स्व–गतीने शिकण्याची संधी :** विद्यार्थ्यांना स्वत:च्या कलाने, स्वगतीने आणि उपलब्ध वेळेनुसार शिक्षण घेता येईल अशी संरचना.

## २.५ धोरणात्मक समायोजन व सुधारणा

- **UGC-DEB, AICTE, NIOS यांचे समन्वयित मार्गदर्शन:** धोरणात्मक स्तरावर 'मुक्तता' आणि 'दूरस्थता' यामधील गोंधळ दूर करून स्पष्ट नियमावली तयार करणे.
- **समान पात्रता मान्यता :** मुक्त व दूरस्थ शिक्षणातून मिळालेल्या पदवी, पदविका व प्रमाणपत्रांना पारंपरिक शिक्षणाइतकीच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये मान्यता मिळविण्यासाठी अधिक प्रयत्न करणे.
- **राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याशी सुसंगतता :** NCrF, NSQF सारख्या धोरणांशी सुसंगती साधणे.

## २.६ सामाजिक–सांस्कृतिक समावेश वाढवणे

- **प्रादेशिक भाषा व स्थानिक संदर्भातील अभ्यासक्रम :** स्थानिक गरजेनुसार निर्मिलेल्या पाठ्यसामग्रीचा समावेश.
- **विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी तंत्र समर्थन :** दृष्टिहीन, श्रवणदोषित वा दिव्यांगांसाठी अनुकूल आंतराफालक (इंटरफेस) उपलब्ध करणे.
- **ग्रामस्तरावर डिजिटल लर्निंग सेंटर :** ग्रामीण भागात ई–साक्षरता, कौशल्य प्रशिक्षण (स्किल ट्रेनिंग) व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

## २.७ संशोधन व नवोपक्रमांना चालना देणे


- **मुक्त व दूरस्थ शिक्षणातील प्रभावितेवर आधारित कृती संशोधन:** अभ्यासक्रम यशस्वितेचे मापन, प्रत्याभरण प्राप्ती व पुढील सुधारणा.
- **डिजिटल लर्निंग प्रयोगशाळा :** शिक्षक, विद्यार्थी व प्रशासक यांच्या सहभागातून नवीन अध्यापन प्रारूपांची (मॉडेल्सची) उभारणी करणे. सुरुवातीला विभागीय केंद्रांवर अशा डिजिटल लर्निंग प्रयोगशाळा स्थापन करण्यात येतील.
- **स्थानिक ज्ञानव्यवस्थेचा समावेश :** लोकपरंपरा, ग्रामसंस्कृती, पर्यावरण, स्थानिक कौशल्ये या बाबींचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करणे.

***

सीमोल्लंघन

# MOVING BEYOND PLACE

## OPEN, DISTANCE AND ONLINE EDUCATION



# ३. सीमोल्लंघन : नातेसंबंध व आत्मीयतेद्वारे समुदायांचे रूपांतरण

## ३.१ स्थळ ऐवजी 'समुदाय' हा केंद्रबिंदू बनवणे

- **आभासी (व्हर्च्युअल) शिक्षण समुदायांची निर्मिती :** भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमध्ये परस्पर अनुबंध व संवाद निर्माण करणारे डिजिटल समूहगट स्थापन करणे. (जसे की: WhatsApp, Telegram, Moodle, MS Teams).
- **स्थानिक ज्ञानाचे जतन व प्रसार :** विविध भागांतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्थानिक कौशल्यांवर व परंपरांवर आधारित उपक्रम करणे व ते इतरांना उपलब्ध करणे.

## ३.२ समावेशकता आणि सहभाग यावर भर

- **संदर्भाधिष्ठित अध्ययन (Contextualized Learning) :** विद्यार्थ्यांचा स्थानिक अनुभव, संस्कृती व सामाजिक स्थिती यांचा अभ्यासक्रमाशी संबंध जोडणे.
- **सहयोगी अभ्यासक्रम संरचना (Participatory Course Design) :** विद्यार्थी, शिक्षक, उद्योजक-व्यावसायिक व स्थानिक समुदायांना अभ्यासक्रम रचनेत सहभागी करून घेणे.
- **मनोबल संमंत्रण सेवा :** विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासासाठी ऑनलाईन/ऑफलाईन माध्यमांतून 'मनोबल संमंत्रण सेवा' उपलब्ध करून देणे. त्यासाठी सर्व विभागीय केंद्रांवर मनोबल संमंत्रकांची नियुक्ती करणे.

## ३.३ सामाजिक बंध व आत्मीयतेला प्रोत्साहन

- **सहयोगी अध्ययन (पीअर-टू-पीअर लर्निंग) :** विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद व सहशिक्षणाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे व त्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
- **डिजिटल सहजीवन (Digital Cohabitation) :** गटचर्चा, प्रकल्पाधारित कार्य आणि अनुभवनिर्मितीमधून सामायिक भावना विकसित करणे.
- **उद्बोधन आंतरजाल (मेंटॉरिंग नेटवर्क) :** जुन्या विद्यार्थ्यांनी नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, जुन्या शिक्षकांनी नव्या शिक्षकांना पाठबळ देणे, तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

## ३.४ समुदायाच्या गरजांशी सुसंगत शिक्षण

- **स्थानिक समस्यांवर आधारित प्रकल्प :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या गाव, शहरी वस्ती वा समाजातील समस्यांवर आधारित प्रकल्प करावेत.
- **सेवा–शिक्षण (Service Learning) :** ऑनलाईन शिक्षणातून सामाजिक सेवेच्या संधी, जसे की ई–ट्युशन, ग्रामस्तरावरील समस्या विश्लेषण इत्यादी.

## ३.५ डिजिटल नातेसंबंध व विश्वास निर्माण करणे

- **संवादात्मक शैक्षणिक वातावरण :** नियमित वेबिनार, चर्चासत्रे, ऑनलाईन कॅम्प फायर, ओपन माईक सेशन्स.
- **संवेदनशील संवाद कौशल्य प्रशिक्षण :** विद्यार्थ्यांना आंतरसांस्कृतिक संवाद, सहानुभूती आणि समावेशकतेचे शिक्षण.

## ३.६ 'विद्यार्थी' नव्हे, 'सहप्रवासी' ही भूमिका

- **सामाजिक–सांस्कृतिक समृद्धीसाठी अभ्यासक्रम :** ज्ञानाची सांस्कृतिक उपयोजनक्षमता वाढविण्यासाठी – 'समाजपरिवर्तनासाठी माध्यमे', 'समाजशास्त्र आणि स्थानिक ज्ञान', 'परंपरा आणि तंत्रज्ञान' अशा स्वरूपाचे अभ्यासक्रम विकसित करणे.
- **स्थानिक सहयोगी संस्था/गटांशी सहकार्य :** स्थानिक स्वयंसेवी संस्था (NGOs), कौशल्य प्रशिक्षण संस्था यांच्याशी भागीदारी करून विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविणे.
- **उद्योग–व्यावसायिकांसोबत ज्ञानसंवर्धन :** उद्योग–व्यावसायिकांसोबत क्षेत्रीय कार्य, थेट कार्यानुभव, आंतरवासिता इ. माध्यमातून ज्ञानसंवर्धनाच्या संधी उपलब्ध करणे.


## ३.७ 'घरबसल्या जगाशी नाते' – डिजिटल सांस्कृतिक आदान–प्रदान

- **संस्कृती–केंद्रित ऑनलाइन कार्यक्रम :** वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकांनी एकमेकांच्या भाषा, गाणी, पाककृती, लोककला व लोकसांस्कृतिक ज्ञानपरंपरांची देवघेव वाढविणे.
- **विद्यार्थ्यांचे अनुभवकथन सत्र :** स्थानिक संस्कृती व पर्यावरणीय लोकानुभवांवर आधारित 'माझे गाव माझी ओळख', 'माझ्या आजीची गोष्ट', 'आमच्या भागातील एक अभिनव प्रयोग' यासारख्या सत्रांचे आयोजन करणे.

## ३.८ तंत्रज्ञानाचा आत्मसंवादासाठी उपयोग

- **कृत्रिक बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानावर आधारित वैयक्तिक संवाद :** विद्यार्थ्यांची शिकण्याची पद्धत ओळखून अध्ययन पारंगतता वाढविण्यासाठी वैयक्तिक प्रोत्साहन व साहाय्य.
- **डिजिटल अवतार/प्रोफाईल संकल्पना :** शिकणाऱ्यांचा समाजाशी वैयक्तिक संबंध अधिक दृढ करणारी रचना तयार करणे.

***



# प्रस्थापिततेपलीकडे मार्गक्रमणा

# MOVING BEYOND THE NORMAL



# ४. प्रस्थापिततेच्या पलीकडे मार्गक्रमणा : मुक्त, दूरस्थ, ऑनलाईन व समावेशी शिक्षणाचा एकत्रित दृष्टीकोन

## ४.१ शिक्षणाची चौकट व्यापक करणे

- **'मुक्तता'** : फक्त प्रवेशापुरती मर्यादित न ठेवता, समावेशक अनुभवासाठी वापरणे. उदा. आर्थिक, सामाजिक, लिंगाधारित, भौगोलिक किंवा शारीरिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनुकूल रचना करणे.
- **समावेशकता (इन्क्लूजन) :** हा मूळ गाभा बनवणे. शिक्षण हे प्रत्येकासाठी खुले, सुलभ व सन्मानजनक होण्यासाठी धोरणात्मक उपाय योजणे.

## ४.२ एकात्मिक शिक्षण प्रणाली तयार करणे

- मुक्त (Open), दूरस्थ (Distance), ऑनलाईन (OL) व यशवंत ऑनलाईन ओपन कोर्सेस (YOOC) यांचा समन्वय साधणे. त्यासाठी एक समान, सर्वसमावेशक, उपयोगकर्ता अनुकूल डिजिटल व्यासपीठ विकसित करणे.
- UGC-DEB, NIOS, IGNOU, SWAYAM विविध शालेय शिक्षण मंडळे, हिंदी, उर्दू इत्यादी विश्वविद्यालये यांसारख्या संस्थांमध्ये समन्वय साधणे, एका छताखाली विविध पर्याय उपलब्ध करणे.

## ४.३ सर्वसमावेशक पाठ्यक्रम व शैक्षणिक साहित्य विकसित करणे

- **व्यवसाय पूरक शिक्षणक्रम :** कृषिव्यवसायपूरक ज्ञानसंवर्धन व प्रयोग परिवार संघटित करण्यासाठी विशेष शेतकरीकेंद्रित शैक्षणिक कार्यक्रम अत्यल्प दरात उपलब्ध करून देणे.
- **दुर्बल घटकांसाठी शिक्षणक्रम :** दिव्यांग, महिला, ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सानुकूलित अभ्यासक्रम.
  उदा. व्हॉइस ओव्हर, साईन लँग्वेज, इन्फोग्राफिक्स, स्थानिक भाषांतील अनुवाद.
- **विविधतेतून एकता :** सांस्कृतिक विविधतेचा सन्मान करणारे अभ्यासक्रम विकसित करणे. उदा. स्थानिक कथा, परंपरा व बोलीभाषेवर आधारित शैक्षणिक साहित्य तयार करणे.

## ४.४ तांत्रिक अडचणी दूर करून 'डिजिटल न्याय' साधणे

- **डिजिटल डिव्हाईड कमी करणे :** किमान विदा (कमी डेटा) लागणारी इलेक्ट्रॉनिक अध्ययनसामग्री ऑफलाईन वापरासाठी डाउनलोड करण्याजोगी सामग्री विकसित करून उपलब्ध करणे.
- **वैकल्पिक माध्यमांचा वापर :** रेडिओ, टीव्ही, मोबाईल मेसेजिंग, स्थानिक ई-लर्निंग सेंटरद्वारे पोचविणे.

## ४.५ शैक्षणिक समुदायात समतेची भावना निर्माण करणे

- **'क्लासरूम बायस' नष्ट करणे :** ऑनलाईन व्यासपीठावर सर्वांना संवाद, अभिप्राय व सहभागाची समान संधी उपलब्ध करून देणे.
- शिकण्याच्या हक्काचे, भेदभावमुक्त व संवादात्मक वातावरण निर्माण करणे.

## ४.६ शिक्षक व व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण व जागरूकता

- समावेशी शैक्षणिक तत्त्वज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षकांचे निरंतर प्रशिक्षण करणे.
- शिक्षक व प्रशासकांमध्ये विविधतेविषयी संवेदनशीलता व समताआधारित धोरणांची जाणीव-जागृती करणे.

## ४.७ धोरणात्मक एकात्मता व ओळख

- मुक्त, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षणातून मिळालेल्या पदवी, पदविका व प्रमाणपत्रांना समान मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहणे.
- NEP 2020, NCrF व UDL (Universal Design for Learning) या तत्त्वांचा आधार.
- सर्व शैक्षणिक स्तरांवर (प्राथमिक ते उच्च) समावेशात्मक धोरणांची अंमलबजावणी.


## ४.८ मूल्यमापनात लवचीकता व समावेश

- **विविध स्तरांवर समावेशक मूल्यमापन पद्धती :** श्राव्य उत्तरे, दृक्‌श्राव्य पटतील. सादरीकरण, स्थानिक भाषांतील उत्तरे इत्यादींचा पुरस्कार.
- मूल्यांकन हे केवळ निकालापुरते नसून प्रगतीकडे वाटचाल करणारे असावे ही भूमिका.

***

# भविष्योन्मुख होणे

# MOVING BEYOND THE NOW



## ५. भविष्योन्मुख होणे : लवचीकता आणि अनुकूलतेद्वारे परिवर्तनशील व क्रमबद्ध घडणाऱ्या बदलांना प्रोत्साहन

### ५.१ आजीवन लवचीकतेचा दृष्टिकोन तयार करणे

- **सांघिक व संचित करण्यायोग्य अभ्यासक्रम करणे :** शिकणाऱ्यांना त्यांच्या गरजांनुसार वेळोवेळी कौशल्ये मिळवता यावीत यासाठी लवचीक अभ्यासक्रम रचना.
- **आजीवन शिक्षण पारपत्र (पासपोर्ट) :** शिक्षण, कौशल्य, प्रमाणपत्र यांचे दस्तऐवजीकरण करणारी डिजिटल प्रणाली.
- **परावर्तनात्मक अध्यापन :** प्रत्येक अभ्यासक्रमात वैयक्तिक चिंतन, अभिप्राय व पुनरावलोकन व्यवस्था समाविष्ट करणे.

### ५.२ अभ्यासक्रमात बदलासाठी सज्जता अंगीकारणे

- **भविष्यानुभव शिक्षण :** कल विश्लेषण (ट्रेंड ॲनलिसीस), परिदृश्य (सीनारिओ) बांधणी, प्रणाली विचार यावर आधारित सत्रे आयोजित करणे.
- **आपत्ती समायोजन प्रकल्प :** आंतरराष्ट्रीय वा स्थानिक आपत्तींच्या अनुषंगाने कृती आराखडे तयार करणे.
- **लवचीकतेचे शिक्षण :** भावनिक बुद्धिमत्ता, अनिश्चिततेत निर्णय घेणे आणि बदल स्वीकारणे यावर आधारित सराव.

वरील मुद्यांनुसार कृती कार्यक्रमांची आखणी करावयाची झाल्यास नमुन्यादाखल 'भविष्यानुभव शिबिर' आयोजित करता येईल. त्यांचे स्वरूप साररूपाने पुढीलप्रमाणे असेल -

**कार्यक्रम:** भविष्यानुभव शिबिर

**उद्दिष्टे :** विद्यार्थ्यांना प्रणाली विचार, बदल व्यवस्थापन व प्रवृत्ती प्रवाह विश्लेषण (ट्रेंड ॲनलिसीस) शिकवणे.

**कृती :**

क) वार्षिक 'Scenario Thinking Bootcamp'

ख) विद्यार्थ्यांकडून भविष्यातील संकटांवरील कृती आराखडे

ग) विविध क्षेत्रांतील तज्ज्ञता (एक्स्पर्ट) सत्रे : हवामान बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) , जागतिक अर्थव्यवस्था

## ५.३ संस्था पातळीवर लवचीक रचना तयार करणे

- **त्वरित अभ्यासक्रम सुरू करण्याची व्यवस्था :** काही आठवड्यांत नवीन अभ्यासक्रम सुरू करता येण्याजोगी प्रक्रिया राबविणे. त्यासाठी त्वरित नवोपक्रम मंच (Rapid Innovation Desk) स्थापन करणे.
- **थेट अभिप्राय यंत्रणा:** शिकणाऱ्यांचा अनुभव तथ्यांवर (डेटावर) आधारित त्वरित सुधारणा.
- **लवचीक शैक्षणिक धोरणे :** प्रत्येक युनिटला स्वायत्तता देऊन प्रयोगशील बनवणे.

## ५.४ सूक्ष्म आणि व्यापक बदलांना प्रोत्साहन

- **प्रायोगिक प्रकल्पांतून धोरणनिश्चिती (Beta 2 Policy) :** छोट्या प्रयोगातून धोरणात्मक निर्णय घेणे.
- **थरात्मक नवकल्पना आराखडा:** लहान बदलांसोबतच दीर्घकालीन शैक्षणिक प्रारूपाची पुनर्रचना करणे.
- **बदलांचे दस्तऐवजीकरण:** प्रयोग व त्यांचे परिणाम यांचा खुला माहितिकोश (ओपन डेटाबेस) तयार करणे.
- **बदलांशी समायोजनक्षम अभ्यासक्रम :** कृषी, आरोग्य, पर्यावरण आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील गतिमान बदल लक्षात घेऊन विद्यापीठाने कृषि-पर्यावरणशास्त्र (ॲग्रोकोलोजी, उदयोन्मुख तंत्रज्ञान (इमर्जिंग टेक्नॉलॉजी), शाश्वत विकास (सस्टेनेबल डेव्हलपमेंट), आरोग्य (हेल्थ) या विषयांवर स्वतंत्र अध्यासने स्थापन करणे.

## ५.५ तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुलभ बदल करणे

- **क्लाउड आधारित शिक्षण:** लवचीक, जलद व अभिवृद्धीक्षम (स्केलेबल) शिक्षण प्रणाली.
- **शिकण्याच्या विश्लेषण प्रणाली (Learning Analytics):** त्वरित अभिप्राय देणाऱ्या प्रणाली वापरून शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही मार्गदर्शन उपलब्ध करणे व त्यात सातत्याने सुधारणा करणे.
- **नो-कोड/लो-कोड टूल्स :** शिक्षक वा विद्यार्थी यांना तांत्रिक ज्ञानाशिवाय नवीन डिजिटल साहित्य तयार करता यावे.

## ५.६ परिवर्तनशील नेतृत्व विकसित करणे

- **बदल व्यवस्थापन प्रशिक्षण :** शैक्षणिक बदलासाठी शिक्षक, प्रशासक यांना प्रशिक्षित करणे.
- **संदर्भाधिष्ठित नेतृत्व :** स्थानिक गरजांनुसार नेतृत्व कौशल्यांचा विकास करणे
- **मेंटरशिप नेटवर्क :** नवकल्पक नेतृत्वाला अनुभवसंपन्न मार्गदर्शकांशी जोड देणे. त्यासाठी शिक्षणक्षेत्राबाहेरील विविध अनुभवसंपन्न व्यक्ती, संस्था आणि शासन यांचे साहाय्य मिळणे.
- शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसाठी देश-विदेशात ज्ञानार्जनासाठी व अनुभव संपन्नतेसाठी सामिलकीच्या स्वरूपाचे (Immersion Programme) विशेष उपक्रमांचे आयोजन करणे व त्यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करणे.

## ५.७ सहकार्याद्वारे लवचीक शैक्षणिक वातावरण निर्माण करणे

- **मुक्त शिक्षणासाठी समूह :** विविध देश-विदेशातील संस्थांचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी सहकार्य मिळविणे.
- **समुदाय ज्ञान प्रयोगशाळा :** स्थानिक समस्यांवर स्थानिक लोकसहभागातून ऑनलाईन /ऑफलाईन उपाय शोधणे.
- **अध्ययनानुभवांचे आदान प्रदान (पीअर लर्निंग एक्सचेंज) :** शिक्षक व विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांचे ऑनलाईन सादरीकरण.

## ५.८ समावेशक आणि न्याय्य अनुकूलतेची जोपासना

- **कमी इंटरनेटमध्ये वापरता येणारे साहित्य:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोबाईल-अनुकूल, कमी बँडविड्थचा कंटेंट.
- **बहुभाषिक आणि बहुपर्यायी माध्यम:** विविध भाषा व माध्यम वैविध्यातून शिकण्याची संधी उपलब्ध करणे.
- **अनुकूलता साहाय्यता निधी:** दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करणे.

## ५.९ नव्या मूल्यांकन संकल्पना राबवणे

- **वाढ व वृद्धी आधारित मूल्यांकन:** प्रगतीकडे लक्ष देणारे आकलन.
- **प्रत्यक्ष अभिप्राय प्रणाली:** कृत्रिम बुद्धिमत्ता व विद्यार्थ्यांच्या सहयोगी प्रतिसादावर (एआय व पिअर अभिप्राय) आधारित सुधारणा करणे.
- **स्वयं-नियोजित मूल्यांकन:** विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यांकनानुसार मार्गक्रमण करण्याची व अध्ययनानुभव प्रदर्शित करण्याची मुभा देणे.

## ५.१० संस्थात्मक आत्मपरावर्तनाची संस्कृती तयार करणे

- **वार्षिक भविष्य पुनरावलोकन:** बदलते संदर्भ व गरजांनुसार योजना बदलणे.
- **लवचीकता लेखापरीक्षण :** संस्थेच्या अनुकूलतेचे नियमित मूल्यांकन करणे.
- **ज्ञान संक्रमण यंत्रणा:** नवकल्पनांचे अनुभव सर्व शिक्षक व संस्था स्तरावर पोहोचवणे.

## ५.११ यशवंतराव चव्हाण फेलोशिप फॉर सोशल ट्रान्सफॉर्मेशन

ही योजना विद्यापीठाने कार्यान्वित करावी. ही शिष्यवृत्ती आयआयटी व आयआयएममधील समाजपरिवर्तन घडवून आणण्याची आवड व क्षमता असणाऱ्या आजी अथवा माजी, ३५ वर्ष वयापेक्षा कमी असणाऱ्या ११ युवकांना दरमहा एकलक्ष रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात यावी.

**ताजा कलम :** मुद्दा क्रमांक ड मधील उपमुद्दा २ साठी कृती आराखड्याचा नमुना उदाहरणादाखल देण्यात आला आहे. त्यानुसार इतर प्रमुख मुद्यांतील सर्व उपमुद्यांसाठी विद्यापीठाने कृती आराखडा तयार करावयाचा आहे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे.

***

# ६. उपसंहार

मुक्त शिक्षणप्रणालीची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि प्रगतीचे क्षितिज विस्तारण्यासाठी खुल्या समावेशक धोरणांवर ( Bridging Capacity) भर देण्यात आला आहे. या आराखड्याच्या यशस्वितेसाठी सर्व संबंधित घटकांना जोडणारी व्यवस्थापकीय नीती प्रशासकीय संस्कृतीची पुनर्घटना आणि कार्यपध्दती यांचे तपशीलवार नियोजन असलेला कृती आराखडा तयार करावा लागेल. (त्याचे तपशीलवार प्रारूप यथावकाश तयार करण्यात येईल.) या पथदर्शक विकास आराखड्यातील मुख्य विकाससूत्रांची सूची पुढीलप्रमाणे -

(१) अध्ययनार्थी लक्ष्यगटाच्या गरजा, प्राधान्यक्रम आणि बाजारपेठीय प्रवृत्तीप्रवाहांचा वेध घेण्यासाठी सर्वेक्षण-संशोधन करण्याला अग्रक्रम. या सर्वेक्षणात विद्यार्थी, संमंत्रक, अभ्यासकेंद्र व्यवस्थापक, उद्योजक, शेतकरी व सामाजिक नेतृत्व करणाऱ्या प्रातिनिधिक व्यक्ती व संस्थांचे अनुभव व अभिप्राय लक्षात घेतले जातील.

(२) शिक्षणक्षेत्रातील स्पर्धात्मकतेचा क्षेत्रीय अभ्यास करून शिक्षणक्रम-अभ्यासक्रम संरचनेचे प्राधान्यक्रम ठरविण्यात येतील.

(३) मुक्त शिक्षणप्रणालीचा लाभ घेणाऱ्या लक्ष्यगटांची व्याप्ती वाढविण्यासाठी शहरी, ग्रामीण व आदिवासी भागात अध्ययन परिवार, प्रयोग परिवार स्थापन करून मुक्त शिक्षणप्रणालीला अध्ययनशील समाजाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून द्यावे लागेल.

(४) ऑनलाईन शिक्षण व संमंत्रण सेवांचा विस्तार करणे. निर्देशात्मक अभियांत्रिकी, ऑगमेंटेड आणि आभासी वास्तवाधिष्ठित शिक्षणप्रणालीचा विस्तार करणे व नव्या ज्ञानप्रवाहांची दखल घेऊन बहुआयामी व बहुभाषिक अभ्यासक्रमांची रचना व पुनर्रचना करणे.

(५) बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे.

(६) सध्याच्या अभ्यासक्रमांची समकालीन प्रस्तुतता व भविष्यकालीन उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांची पुनःसमीक्षा (Review) करणे.

(७) तंत्रज्ञानात्मक बदलांशी अनुरूपता साधण्यासाठी मुद्रित अध्ययन साहित्याचे ऑनलाईन अध्ययनस्थळात रूपांतर करण्याचा प्रकल्प हाती घेणे.

(८) डिजिटल माध्यमांतून अध्ययन साहित्य विकसित करणे व अध्यापन शैलींचा विकास करणे. यासाठी तंत्रकुशल प्रशिक्षित शिक्षकांचा संघ (Internet based Mind Set) तयार करणे.

(९) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आंतरजालावरील अध्ययन-अध्यापन स्रोतांचा कोश विकसित करणे. त्यासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्रातील तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता व डिजिटल ज्ञानस्रोतांचे आकलन असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचा ज्ञानस्रोत केंद्रात सहभाग वाढविणे.

(१०) अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनपद्धतीत कृत्रिम बुद्धिमत्ता व सर्जनशीलता यांची सांगड घालणारी प्रारूपे विकसित करणे.

(११) मुक्त शिक्षणप्रणालीचा समाजाभिमुख गुणात्मक विकास आणि विस्तार करण्यासाठी इतर क्षेत्रांबरोबर शेती, आरोग्य, सार्वजनिक नीती, शाश्वत विकास, शिक्षण इत्यादी क्षेत्रांवर विशेष भर देणारे कृति-कार्यक्रम अमलात आणणे.

कुठल्याही विद्यापीठाची कार्यक्षमता आणि प्रगती विद्यापीठाच्या खुल्या व सर्वसमावेशक धोरणांवर (ब्रिजिंग कॅपेसिटी) अवलंबून असते. या भूमिकेतून विद्यापीठाशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांना जोडणारी व्यवस्थापकीय संघटननीती व कार्यपद्धती यांचे तपशीलवार नियोजन करण्यात येईल. ब्रिजिंग कॅपेसिटी या भूमिकेतून पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन व डिजिटल युगातील प्रारूपे आणि प्रणाली लक्षात घेऊन विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्यसंस्कृतीची पुन:संघटना बांधण्याची गरज आहे. त्या दृष्टीने तपशीलवार कृती आराखडा तयार करण्यात येईल. प्रस्तुत विकास आराखड्याचा उत्तरार्ध या कृती आराखड्याच्या स्वरूपात सादर करण्यात येईल.

***



राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

# *Certificate of Accreditation*

*The Executive Committee of the*

*National Assessment and Accreditation Council*

*is pleased to declare*

*Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik*

*Dnyangangotri, Govardhan, Dist. Nashik, Maharashtra as*

*Accredited*

*with CGPA of 3.02 on four point scale*

*at A grade*

*valid up to April 11, 2027*

*Date : April 12, 2022*

*Director*

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७
फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६
वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in